राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांना सन २०२०-२१ पर्यंतच्या कर्जाच्या वार्षिक हप्त्याची व्याजासह परतफेड सन २०२१-२२ च्या मंजूर तरतुदीतून करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः अर्थसं-१३२१/प्र.क्र.४४/९-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३० ऑगस्ट, २०२१

वाचा :-

१. उप निदेशक (वित्त), रा.स.वि.नि.,नवी दिल्ली यांचे क्र.एनसीडीसी -एऍन्डसी/नऊ(१)/आरईपी/०९/१२७९, दि.४.६.२०२१.
२. शासन निर्णय वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२१/प्र.क्र.४८/अर्थ-३, दि.२४.०६.२०२१.
३. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा-५, दि.१०.०५.२०१६
४. शासन निर्णय सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.पुरक १९२१/प्र.क्र.३३/२०२१ /१७ स, दि.२०.०७.२०२१.

प्रस्तावना :-

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागांतर्गत सहकार प्रभागासाठी (साखर) राष्ट्रीय सहकारी विकास निगम पुरस्कृत योजनांतर्गत राज्य शासन सहकारी साखर कारखान्यांना प्रकल्पांच्या उभारणीकरीता व मार्जिन मनी योजनेंतर्गत त्या त्या योजनेच्या मंजूर आकृतीबंध/ मंजूर वित्तीय आराखड्यानुसार शासकीय भागभांडवल / कर्ज उपलब्ध करुन देते. राष्ट्रीय सहकारी विकास निगममार्फत या योजनेंतर्गत राज्य शासनास उपलब्ध करुन देण्यात येणारा निधी राज्य शासनावर संपूर्णपणे कर्ज म्हणून गणला जातो. सन २०२०-२१ पर्यंत राज्य शासनास राष्ट्रीय सहकारी विकास निगम यांनी मंजूर केलेल्या कर्जापैकी, परतफेडीकरीता पात्र कर्जातील मुद्दलाची व मंजूर कर्जावरील व्याजाच्या देय हप्त्यांची परतफेड करण्याकरीता राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांनी संदर्भाधिन दि.०४.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनास सूचित केले आहे. सदर पत्रानुसार राज्य शासनास मंजूर करण्यात आलेल्या कर्जापैकी मुद्दल रु.७,१८,००,०००/- व व्याज रु.१,७१,७६,९३०/- असे एकूण रु.८,८९,७६,९३०/- एवढी रक्कम राष्ट्रीय सहकारी विकास निगमास अदा करण्याची विनंती शासनास केली आहे. एन.सी.डी.सी.ने प्रस्तावित केल्यानुसार दि.२०.०९.२०२१ रोजी किंवा त्यापूर्वी रक्कम अदा केल्यास व्याजावर रु.१५,८६,०१७/- इतक्या रकमेची सूट मिळणार आहे. म्हणजेच रु.७,१८,००,०००/- मुद्दल व रु.१,५५,९०,९१३/- इतकी व्याजाची रक्कम अशी एकूण रु.८,७३,९०,९१३/- इतकी रक्कम एनसीडीसीला दि.२०.०९.२०२१ पर्यंत अदा करणे आवश्यक आहे. एनसीडीसी कर्ज वार्षिक हप्ता परतफेड योजनेंतर्गत रु.७,१८,००,०००/- इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली असून, व्याज परतफेड योजनेंतर्गत रु.७७,९५,०००/- इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे.

व्याज परतफेड योजनेंतर्गत निधी कमी पडत असल्याने आवश्यक असलेली रु.७७,९५,९१३/- इतक्या रकमेची पुरक मागणी पावसाळी अधिवेशन, २०२१ मध्ये सादर करण्यात आली होती, त्यापैकी रु.७७,९५,०००/- इतक्या रकमेची पुरक मागणी मान्य झालेली आहे. सबब, एन.सी.डी.सी. यांना दि.२० सप्टेंबर, २०२१ रोजी किंवा त्यापुर्वी देय असलेली रक्कम रु.८,७३,९०,९१३/- पैकी उपलब्ध रुपये रु.८,७३,९०,०००/- (कर्जाची मुद्दल रु.७,१८,००,०००/- + व्याज रु.१,५५,९०,०००/-) इतकी रक्कम रा.स.वि.नि.ला अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

२. कोषागारात देयके पारित करताना घ्यावयाची दक्षता या विषयाबाबत दि.१०.०५.२०१६ रोजी वित्त विभागाने परिपत्रक निर्गमित केले असून त्या अनुषंगाने या प्रस्तावासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे:-

१) विभागास प्रदान वित्तीय अधिकार :- वित्त विभागाच्या दि.२४.०६.२०२१ च्या शासन निर्णयानुसार रा.स.वि.नि. यांना कर्ज व व्याज वार्षिक हप्ता परतफेडीसाठीच्या अनिवार्य योजनांसाठी (बाब :- ५६, कर्ज व ४५, व्याज) वित्त विभागाची संमती आवश्यक आहे.

२) मंजूर निधी :- सन २०२१-२२ या वर्षात कर्जाच्या मुद्दलाची परतफेड करण्यासाठी रु.७,१८,००,०००/- व व्याजासाठी रु.७७,९५,०००/- इतक्या रकमेची अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे. तसेच, व्याज लेखाशिर्षांतर्गत आवश्यक असलेली रक्कम रु.७७,९५,९१३/- पैकी रु.७७,९५,०००/- इतक्या रकमेची पुरक मागणी मान्य झालेली आहे.

३) मागील ३ महिन्यांपूर्वी सदर लेखाशिर्षांतर्गत कोणताही खर्च झालेला नाही.

४) विचाराधीन लेखाशिर्षांतर्गत एक वर्षापूर्वीचे कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

५) ५ ते ९ येथील बाबी लागू नाहीत.

राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांना रु.८,७३,९०,०००/- इतकी रक्कम अदा करण्यासाठी शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

शासन निर्णय:-

राज्यातील सहकार विकासाकरीता राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांनी सहकार प्रभागांतर्गत (साखर) राबविण्यात येणाऱ्या मार्जिन मनी योजनेसाठी राज्य शासनास कर्ज मंजूर केले होते. सदरच्या कर्जाची वार्षिक हप्ता मुद्दल रु.७,१८,००,०००/- (रुपये सात कोटी अठरा लाख फक्त) व व्याजाची रक्कम रु.१,५५,९०,०००/- (रुपये एक कोटी पंचावन्न लाख नव्वद हजार फक्त) अशी एकूण रु.८,७३,९०,०००/- (रुपये आठ कोटी त्र्याहत्तर लाख नव्व्द हजार फक्त) इतकी रक्कम सन २०२०-२१ पर्यंत परतफेडीच्या हप्त्यापोटी राष्ट्रीय सहकारी विकास निगमाला अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर खर्च चालू आर्थिक वर्षात (२०२१-२२) खालील लेखाशिर्षांतर्गत करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा :-

कर्ज – रु.७,१८,००,०००/- (रुपये सात कोटी अठरा लाख फक्त)
मागणी क्रमांक व्ही-४
मुख्य लेखाशिर्ष
६००३, राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण
(१०८) राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून मिळालेली कर्जे
(००)(०१) राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाकडून मिळालेली कर्जे (सहकार) (अनिवार्य)
(६००३ ०२४२), भारित,
५६, कर्जाची परतफेड

व्याज- रु.१,५५,९०,०००/- (रुपये एक कोटी पंचावन्न लाख नव्वद हजार फक्त)
मागणी क्रमांक व्ही-१
मुख्य लेखाशिर्ष
२०४९, व्याज प्रदाने
०१, देशांतर्गत ऋणांवरील व्याज
२००, देशांतर्गत इतर ऋणांवरील व्याज
(०२)(०१) राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाकडून मिळणाऱ्या कर्जावरील व्याज (सहकार) (अनिवार्य)
(२०४९ १०४३), भारित,
४५, व्याज

३. राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांना मंजूरी केलेली उपरोल्लिखित रक्कम अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडून आहरण करुन निगमाला त्याचे वितरण करण्यासाठी श्रीमती शि.दि.गायकवाड, कार्यासन अधिकारी, रोखशाखा, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून तसेच, श्री.सु.लो.अंबिलपुरे, उप सचिव (९-स/अर्थसंकल्प) (V००११), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. उपरोल्लेखित रक्कम RTGS/NEFT सुविधेव्दारे राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांना अदा करावयाचा असून त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

Name of the account	National Cooperative Development Corporation
Name of the Bank	State Bank of India
Name of the Branch	Commercial Branch, Nehru Place, New Delhi
Current Account No.	32164052874
IFSC Code	SBIN 0004298

५. राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांनी सदर रक्कम प्राप्त झाल्याची पोच महाराष्ट्र शासनास नोंदणीकृत डाकेने तसेच ई-मेलव्दारे मुद्रांकित पावती पाठवावी.

६. संदर्भाधिन क्र.२ येथील वित्त विभागाच्या दिनांक २४.०६.२०२१ च्या शासन निर्णयातील अटींची तसेच, त्यासोबतच्या परिशिष्टातील प्रस्तावाला लागू असलेल्या अटींची पूर्तता होत असल्याचे (परिशिष्टातील अ.क्र.८ येथील अट वगळून) प्रमाणित करण्यात येत आहे.

७. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.३७५/२०२१/व्यय-२, दि.११.०८.२०२१ व दि.२३.०८.२०२१ अन्वये प्राप्त मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्यांचा सांकेतांक क्रमांक २०२१०८३०१६१३०३७८०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Shilpa Dilip Gaikwad
Date: 2021.08.30 16:14:17 +05'30'

(शि. दि. गायकवाड)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.प्रधान सचिव (सहकार व पणन) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. उप सचिव (साखर), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. कक्ष अधिकारी(३-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ (६प्रती)
५. कक्ष अधिकारी (व्यय-२/अर्थोपाय/अर्थसंकल्प-१३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
९. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. सहसंचालक, लेखा व कोषागारे (संगणक शाखा) नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई -३२
११. संचालक, राष्ट्रीय सहकार विकास निगम, ४ सिरी इन्स्टिटयुशनल एरिया, हौजखास, नवी दिल्ली- ११०००१
१२. प्रादेशिक उपसंचालक, राष्ट्रीय सहकार विकास निगम, ५ बी.जे.रोड, पुणे
१३. निवडनस्ती (९-स).